# अडत व्यापारी शिक्षण संस्थेची निवडणूक बिनविरोध



देशोन्नती वृत्तसंकलन

**देगलूर** : अडत व्यापारी शिक्षण संस्थेची कार्यकारिणी मंडळाची निवडणूक बिनविरोध संपन्न झाली असून संस्थेच्या अध्यक्षपदी प्रकाश निवृत्तीराव पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन जयराम चिद्रावार, सचिव शशिकांत नारायणराव चिद्रावार, सहसचिव राजकुमार राम महाजन, कोषाध्यक्ष विलास शंकरराव तोटावार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य म्हणून डॉ. कर्मवीर पोशट्टी उनग्रतवार, देवेंद्र बालाजीराव मोतेवार, नारायणराव रामन्ना मैलागिरे, सूर्यकांत गोविंद नारलावार, गंगाधरराव यशवंतराव जोशी, रविंद्र काशिनाथअप्पा द्याडे, चंद्रकांत राजन्ना नारलावार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर स्विकृत सदस्य म्हणून गुरूराज शशिकांत चिंद्रावार, विजय पोशट्टी उनग्रतवार यांची निवड करण्यात आली. यावेळी सर्वसाधारण सभा सदस्य सुभाष व्यंकटराव देशपांडे व गोविंदप्रसाद मांगीलाल झंवर उपस्थित होते. या निवडीबदल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ व उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक संग्राम पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने आभिनंदन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. सय्यद मोहसिन अली तर सहाय्यक म्हणून कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी काम पाहिले. (ता.प्र.)

Scanned with OKEN Scanner